**नमुना – १ (नियम ४ व ५ पहा)**
**जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर (नगरपालिका शाखा)**
***पन्हाळा नगरपरिषद- जागा क्र.८-क पोट निवडणूक***

क्र.कार्या.११/नपा/पोट निवडणूक /एसआर/०९/अ/१८
जिल्हाधिकारी कार्यालय,कोल्हापूर.
दि.२८/१२/२०१८

## - आदेश -

महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र नगरपालिका व नगरपरिषदा निवडणूक नियम १९६६ मधील तरतुदीनुसार व मा.कक्ष अधिकारी,राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, मुंबई यांचे कडील पत्र क्र.रानिआ/नप-२०१८/प्र.क्र.२०/का-६, दि.२७/१२/२०१८ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन मी, जिल्हाधिकारी कोल्हापूर खालीलप्रमाणे अनुसूची १ मध्ये विनिर्दीष्ट करण्यात आलेल्या पन्हाळा नगरपरिषदेच्या जागा क्र.८-क साठी पोट निवडणूक कार्यक्रम- २०१९ संबंधात पुढील प्रमाणे निवडणूक कार्यक्रम जाहिर करीत आहे.

**परिशिष्ट - १**

| अ.क्र. | निवडणूकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची/संपविण्याची दिनांक |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी, यांनी निवडणूक कार्यक्रम जारी करण्याचा दिनांक | दि.२९/१२/२०१८ (शनिवार) |
| २ | नामनिर्देशनपत्र मा.राज्य निवडणूक आयोगाने निश्चीत केलेल्या वेबसाईटवर भरण्याकरीता उपलब्ध असण्याचा कालावधी | दि.०२/०१/२०१९ (बुधवार) सकाळी ११.०० वाजलेपासून ते दि.०९/०१/२०१९ (बुधवार) दुपारी ०२.०० वाजेपंत |
| ३ | वरील नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याचा कालावधी | दि.०२/०१/२०१९ (बुधवार) ते दि.०९/०१/२०१९ (बुधवार) (सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० वाजे पर्यंत) **रविवार, दि.०६/०१/२०१९ रोजी सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशनपत्रे स्विकारली जाणार नाहीत.** |
| ४ | नामनिर्देशनपत्राची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि.१०/०१/२०१९(गुरुवार) सकाळी ११.०० वाजलेपासून |
| ५ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक अपिल नसेल तेथे | दि.१७/०१/२०१९ (गुरुवार) दुपारी ०३.०० वाजेपर्यंत |
| ५-अ | अपील असल्यास,<br>१) वैधरित्या नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून तीन दिवसांच्या आत, जिल्हा न्यायाधिशाकडे अपिल करता येईल.<br>२) निवडणूक निर्णय अधिकारी यांनी अपिलाचा निर्णय लवकरात लवकर प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्न करावेत. | अपिलाचा निर्णय ज्या दिनांकास करण्यात येईल त्या दिनांकानंतर तिस-या दिवशी किंवा तत्पुर्वी. |
| ६ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | उमेदवारी मागे घेण्यासाठीच्या शेवटच्या दिवसानंतरच्या लगतच्या दिवशी |
| ७ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | दि.२७/०१/२०१९ (रविवार) सकाळी ७.३० पासून ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत |
| ८ | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | दि.२८/०१/२०१९ (सोमवार) सकाळी १०.०० वाजलेपासून |
| ९ | महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे. | महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १९ मधील तरतुदीनुसार |

दिनांक – २८/१२/२०१८
ठिकाण - कोल्हापूर.

जिल्हाधिकारी कोल्हापूर
जि. कोल्हापूर

(अविनाश सुभेदार)
**जिल्हाधिकारी, कोल्हापूर**



Scanned by CamScanner